६) बांधून झालेली इमारत यांची व्यवस्था व स्वच्छता नीट राहावी या उद्देशाने सामाईक खर्चाच्या काही बाबी आम्ही ठरविल्या आहेत. त्या परिशिष्ट – ४ यात नमुद करुन दिल्या आहेत. याप्रमाणे सामाईक खर्चाच्या बाबींसाठी डिपॉझीट म्हणून रक्कम रुपये ठरल्या प्रमाणे तुम्ही आमचे कडे आम्ही मागू त्यावेळी जमा करावयाची आहे. तुम्ही एकूण इमारतीतील काही बांधीव भाग विकत घेत असल्याने तुम्ही स्वतःहुन इमारत उत्तम राहावी, तिचे नुकसान सुध्दा होऊ देणार नाही. सदर शर्ती व अटी कबूल असल्याबद्दलची सही केली आहे. आम्ही तुमचे लाभांत प्रस्तुतचे खरेदीखत ज्या प्रकारे लिहून देत आहोत त्याच प्रकारे अन्य बांधीव भाग विक्री करते वेळी अन्य व्यक्तींबरोबर खरेदीखत /सौदापावती करार करणार आहोत.

७) आम्ही तुम्हांस परिशिष्ठ २ यांत वर्णन केल्या प्रमाणेची बांधीव जागा या खरेदीखताने खरेदी देण्याचे ठरविले आहे. मात्र अन्य बांधून होणाऱ्या जागा, त्यांचा एफ. एस. आय., पार्किंग एरिया, गच्ची, मार्जिनल स्पेसेस याचे सर्व हक्क आमचे कडेच ठेवलेले आहेत आणि त्या बाकी जागांची विल्हेवाट, विक्री अगर बांधकाम आम्ही आमचे सोयीने तुम्हांस मिळणाऱ्या जागेस त्रास न होवू देता पूर्ण करणार आहोत. अथवा त्या बांधकामामुळे तुम्हांस मिळणारे क्षेत्र कमी होईल, नुकसान होईल असे बांधकाम आम्ही करणार नाही.

८) तुम्हास घ्यावयाची परिशिष्ठ २ यात वर्णन केलेली जी बांधीव जागा न घेता , त्या जागेचे क्षेत्र अनावश्यकरित्या कमी न करता आम्ही आमचा इतर इमारतीचा प्लॅन बदलू शकू व त्यास तुम्ही आम्हांस संमती दिली आहे.

९) परिशिष्ठ १ यावर बांधलेल्या इमारतीतील बांधीव भागधारकांची मिळून को– ऑपरेटीव्ह ॲक्ट १९६० मधील तरतुदीनुसार सहकारी सोसायटी स्थापन करावयाची या विषयी निर्णय घेणेचा अधिकार आमचा आहे व राहील. तसेच सदरील / बायलॉज, नियम व अटी तुमचेवर बंधनकारक राहतील.

१०) तुमचे व आमचे वरील शर्ती व अटी व्यतिरीक्त बाकीच्या ठरलेल्या शर्ती व अटी पुढे लिहील्याप्रमाणे, :–

१) परिशिष्ठ २ यांत वर्णन केलेली जागा परिशिष्ठ ३ यांत नमूद केलेल्या स्पेसिफिकेशन प्रमाणे बांधून देण्याचे आम्ही कबूल करीत असून परिशिष्ठ २ यांत वर्णन केलेल्या जागेचे बिल्टअप **७०.२२७ चौ. मी.)** असे प्रमाणभूत मानून त्या जागेची किंमत तुमचे व आमचे दरम्यान रक्कम रुपये / – (अक्षरी रक्कम रुपये मात्र) ठरविण्यात आली आहे. यामध्ये फक्त बांधीव जागेच्या किंमतीचा समावेश असून त्या शिवाय या खरेदीखतात नमूद केलेल्या व पुढे सरकारी आदेशानुसार ज्या काही जादा गोष्टी मिळकतीच्या ठिकाणी काराव्या लागतील त्या खर्चाचे रकमांचा समावेश नाही. त्या खर्चाच्या रक्कम तुम्ही आम्हांस स्वतंत्रपणे द्यावयाच्या आहेत. परिशिष्ठ २ यांत ठरलेल्या बांधीव भागाची एकूण किंमत रक्कम रुपये /– (अक्षरी रक्कम रुपये _मात्र) तुम्ही आम्हास खालील प्रमाणे अदा केलेली आहे.

तपशिल

रक्कम रु.

१) /–अक्षरी रुपये एक लाख मात्र मी तुमचे पासुन ----------- चा चेक कमांक ----------- दिनांक --------- रोजीचा